**Sakal, Pune, Aug 27 2008**

# माहिती तंत्रज्ञान प्रश्नमंजूषा स्पर्धेत डॉ. श्यामराव कलमाडी कॉलेज विजेते

पुणे, ता. २६ : 'माहिती-तंत्रज्ञानाच्या सतत बदलत्या क्षेत्राविषयी शालेय विद्यार्थ्यांना कितपत माहिती आहे,' या थीमवर 'टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) तर्फे घेण्यात आलेल्या 'टीसीएस आयटी वीझ २००८ एडिशन' या प्रश्नमंजूषा स्पर्धेत डॉ. श्यामराव कलमाडी ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी विभागीय अंतिम फेरी जिंकून बाजी मारली. विखे पाटील मेमोरिअल स्कूलने उपविजेतेपद पटकाविले.

देशभरातील शालेय विद्यार्थ्यांसाठी होणाऱ्या या स्पर्धेच्या विभागीय अंतिम फेरीसाठी डॉ. श्यामराव कलमाडी ज्युनिअर कॉलेजसह पुण्यातील द आर्मी पब्लिक स्कूल, दिल्ली पब्लिक स्कूल, द बिशप्स स्कूल, सिंबायोसिस स्कूल, विखे पाटील मेमोरिअल स्कूल अशा सहा शाळांची निवड झाली होती.

भारताच्या डेव्हिस कप संघाचे प्रशिक्षक नंदन बाळ, टीसीएसच्या

पुणे विभागाचे प्रमुख अरविंद पाध्ये, टाटा रिसर्च डेव्हलपमेंट ॲण्ड डिझाईन सेंटरच्या सिस्टिम्स रिसर्च लॅबचे प्रमुख प्रा. हॅरिक वीन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रथम पारितोषिक विजेत्यांना विजेत्या करंडकासह लॅपटॉप मिळाले. डॉ. श्यामराव कलमाडी ज्युनिअर कॉलेजचे हर्ष अलकूलकर आणि हर्ष रोविंद्रा यांनी हे पारितोषिक स्वीकारले. उपविजेत्या विखे पाटील मेमोरिअल स्कूलच्या तेजस देशपांडे आणि अमोल जोशी यांना करंडकासह डीव्हीडी प्लेअर आणि डिजिटल कॅमेरा हे पारितोषिक मिळाले.



**यशवंतराव चव्हाण नाट्यगृह : प्रश्नमंजूषा स्पर्धेच्या विभागिय अंतिम फेरीत डॉ. श्यामराव कलमाडी ज्युनिअर कॉलेजने विजेतपद पटकाविले.**